

“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur’s

# Ramkrishna Paramhansa Mahavidyalaya, Osmanabad


(Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)

|| NAAC Reaccredited ‘B+’ Grade || || DBT-STAR College by Govt. of India ||

|| UGC STATUS: College with Potential for Excellence ||

---

# Participation of Students in Writing of Periodicals in College Annual Magazine



"Education for Knowledge, Science and Culture"

- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

# Ramkrishna Paramhansa Mahavidyalaya, Osmanabad, MS

(Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)

# Vivekanand Annual Issue – 2022-2023

## Annual College Magazine

To read the magazine – Scan the QR code

## The Publication Team

**Chairperson**

Prin. Dr. Jaysingrao Deshmukh

**Chief Editor**


Prof. B. H. Karhade

**Editors**

| Marathi | English | Hindi |
|---|---|---|
| Prof. Raja Jagtap | Dr. Laxman Bhargande | Dr. Keshav Kshirsagar |
| Prof. Bhagyashri Gondkar | Dr. Vaibhav Agale | Prof. Mohan Rathod |

IQAC – Dr. S. S. Phulsagar

Advertisement Committee: Dr. M. D. Golwal



“ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ”

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद संलग्नित

# रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद

( U.G.C. Status College with Potential for Excellence IInd Phase)

STAR College Status by DBT Govt. of India

# विवेकानंद

२०२२-२३



# अ । नु । क्र । म । णि । का

## वरिष्ठ विभाग : गद्य


| अ.क्र. | लेख | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|---|
| १) | मायबोली मराठी | कु. सानिका रावसाहेब तांबे | बी. कॉम. भाग-१ |
| २) | शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक विचार | कु. ज्योती राजेंद्र कदम | बी.एस्स.सी. भाग-१ |
| ३) | शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे विचार | स्वराज धनंजय लोंढे | बी.एस्स.सी. भाग-२ |
| ४) | स्त्री-भ्रूण हत्या | कु. वैष्णवी साळुंके | बी.एस्स.सी. भाग-२ |
| ५) | भारतीय संविधान आणि सामाजिक स्वातंत्र्य | कु. आदित्य शाम जाधव | बी. ए. भाग-१ |
| ६) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतकऱ्यांविषयी विचार | कु. प्रतिमा राजा जगताप | बी. एस्स.सी. भाग-१ |
| ७) | स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव | सत्यभामा शिवाजी निंबाळकर | बी. कॉम. भाग-१ |
| ८) | मराठी भाषा काळाची गरज | सचिन व्यंकट वाघमारे | बी. कॉम. भाग-२ |
| ९) | तुमचे उज्ज्वल भविष्य तुमच्या हातात | कु. मयुरी महादेव मुळुक | बी. कॉम. भाग-१ |
| १०) | संत तुकाराम | कु. स्वप्नाली अशोक चौगुले | बी. कॉम. भाग-२ |
| ११) | प्रिय बाबा | कु. साहयता सत्यवान पाटील | बी. ए. भाग-१ |
| १२) | बेरोजगारी एक समस्या | कु. अमृता सुनिल गायकवाड | बी. ए. भाग-१ |
| १३) | आईचे महत्त्व | कु. वैष्णवी मोहन चव्हाण | |


## वरिष्ठ विभाग : पद्य


| अ.क्र. | लेख | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग |
|---|---|---|---|
| १) | भारत देशा | प्रतिभा प्रकाश भालेराव | बी. ए. भाग-२ |
| २) | उत्सव प्रजासत्ताक दिनाचा | तेजश्री विष्णू येडके | बी. ए. भाग-२ |
| ३) | क्रांतीचा जयजयकार | निशा दादाराव कसबे | बी. ए. भाग-२ |
| ४) | तिरंगा | स्वाती वाघमारे | बी. ए. भाग-२ |
| ५) | मराठी | शिवानी शिवदास सूर्यवंशी | बी. कॉम. भाग-१ |
| ६) | आईची माया | पल्लवी सुनील जाधव | बी. कॉम. भाग-१ |
| ७) | विद्यार्थ्यांनो | सुविधा सुनील दाभाडे | बी. कॉम. भाग-१ |
| ८) | मन | मोरे निकिता अंबादास | बी. कॉम. भाग-१ |
| ९) | राजकारण | रोशन बरकतअली सय्यद | बी. कॉम. भाग-१ |
| १०) | मन फुलपाखरू | प्रार्थना गरगडे | बी. कॉम. भाग-१ |
| ११) | विचार | ऐश्वर्या भगवान सुरवसे | बी. कॉम. भाग-१ |
| १२) | भारत आम्हा सर्वांचा देश आहे | निलेश भास्करराव नगदी | बी. एस्सी. भाग-२ |
| १३) | मृत्यू | सहाय्यता पाटील | बी. ए. भाग-१ |
| १४) | काही चुका | अमृता सुनिल गायकवाड | बी. ए. भाग-१ |

# मायबोली मराठी

**- सानिका रावसाहेब तांबे,** बी. कॉम. भाग-१

आज जगभरात देशा-देशांतील लोक एकमेकांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जोडले गेले आहेत. लोकांना एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण करताना संवाद महत्त्वाचा असतो. यासाठी त्यांची मदत भाषा करीत असते. प्रत्येकाची आपापली एक विशिष्ट बोलीभाषा असते. त्या त्या ठिकाणातील लोक त्या त्या ठिकाणची मायबोली बोलत असतात. त्या बोलीत ते व्यक्त होत असतात.

आपण बोललेली भाषा समोरच्या व्यक्तीला कळली म्हणजे ती योग्य भाषा आहे, हे इथे सिद्ध होते. आजच्या काळात प्युअर मराठी म्हणजे मुंबई, पुण्यातील लोकांनी बोललेली भाषा श्रेष्ठ असे नसते. एखादा, गावातील व्यक्ती शहरात नवीन आला तर त्याला सर्वजण त्या ठिकाणची विशिष्ट भाषा बोलायला, वागायला भाग पाडत असतात. त्याला कमीपणा वाटेल अशी वातावरण निर्मिती नकळत का होईना होत असते. हे खूप चुकीचे आहे. मुळात 'नेमकी मराठी भाषा' अशी कोणती संकल्पनाच या जगात नाही असे मला वाटते. संवादासाठी दोन व्यक्तींमध्ये झालेली विचारांची देवघेव ही त्या व्यक्तींच्या भाषेमधून होत असते. आपण काय बोलतो हे समोरच्याला कळले, विषय संपला! यात भाषेतील चुका काढत बसण्यात काहीच अर्थ नाही.

भाषा म्हणजे संस्कृती, परंपरा, प्रवाह, अस्मिता. एखाद्या भाषेच्या बोलीभाषा जितक्या जास्त तेवढी ती भाषा सर्व संपन्न असते. कोणतीही बोली भाषा ही मूळ प्रमाण भाषेलाही समृद्ध करते. प्रमाण भाषेहून बोली या अधिक जिवंत आणि रसरशीत असतात.

महाराष्ट्राची शान म्हणजे आपली मायबोली 'मराठी भाषा' आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रातील प्रत्येक भाषा प्रत्येक प्रांतासाठी ती निराळी असते. ती तेथील लोकांची होते आणि ती आवडते. आपली मराठी भाषा ही संस्कृत भाषेतून आली आहे. तशा भारतातल्या अनेक भाषा संस्कृत भाषेतून आल्या आहेत. आपली मराठी भाषा सर्व महाराष्ट्राची एक असली तरी ती दर बारा कोसावर वेगळ्या पोटभाषेत बोलली जाते.

मायबोली म्हणजे अशी भाषा जी आपल्याला जन्मल्यावर आपल्या आईकडून मिळते. आईजवळ जी भाषा असते तीच भाषा मुलं आत्मसात करीत असतात. लेखी भाषा तिच असली तरी बोली भाषेत फरक पडतो. मराठी भाषेतसुद्धा असे वेगवेगळे प्रकार असतात ज्यांना प्रांतीय पोटभाषा असे म्हणतात. कोकणातील कोकणी, घाटावरची म्हणजे देशावरची वेगळी भाषा, घाटी भाषा वेगळी, वऱ्हाडी भाषा वेगळी, मध्यप्रांतातील, मध्यप्रदेशातील हिंदीमिश्रित आणि गोव्याकडील कोकणी वेगळी असते.

भारत देशात मराठी बोलणारी माणसे जवळपास सगळ्या राज्यांत विखुरलेली आहेत. जगातील बहुतांश प्रमुख भाषांप्रमाणेच मराठी भाषाही एकापेक्षा जास्त पद्धतींनी बोलली जाते. मुख्य भाषेशी नाते कायम ठेवलेली, तिची बोलीभाषा दर १२ कोसांगणिक उच्चारांत, शब्दसंग्रहांत, आघातात व वाक्प्रचारांत बदलत राहते. असे असले तरी लिखित भाषेत फारसा फरक नसतो.

पिढ्यान्‌पिढ्या विशिष्ट राज्यात स्थायिक झाल्यामुळे मराठी भाषकांच्या मूळ मराठी बोलीवर त्या राज्याच्या स्थानिक भाषेचा ठसा सुस्पष्टपणे उमटलेला दिसतो. त्यामुळे 'मी मराठी बोलतो' असे कोणी विधान केले तर 'कोणती मराठी बोलता?' असा प्रश्न आपोआपच उपस्थित होतो. कारण मूळ मराठी भाषेचे व्याकरण जरी एकच

असले तरी स्थान माहात्म्यानुसार मराठी बोलीचे 'कोकणी मराठी', कोल्हापुरी मराठी', कारवारी मराठी, अहिराणी, मराठवाडी, नागपुरी, असे अनेकविध प्रकार कानावर पडत असतात. या प्रत्येक प्रकारात त्या त्या ठिकाणच्या स्थानिक लोकजीवनातले अनेक शब्द आलेले दिसतात. जे लहान शब्दकोषात सापडतीलच असे नाही. अहिराणी ही महाराष्ट्रातील एक प्रमुख बोलीभाषा मानली जाते. अहिराणी भाषेचे एका कवींनी चार ओळींमध्ये विचार व्यक्त केले आहेत. ते पुढीलप्रमाणे -

''अहिराणी
जशी दहिमान लोणी
सगळा पारखी ताकना
इले पारखं नही कोणी''

इतकी गोड ही अहिराणी भाषा आहे. महाराष्ट्रात गोंड, भिल्ल, वारली, पावरी, मावची, कोरकू, कोलामी, कातकरी, माडिया आदी बोलीभाषा प्रमुख आहेत. या बोलीभाषा प्रमुख आहेत. या बोलीभाषा अतिप्राचीन आहेत. गोंडी बोलीभाषा महाराष्ट्रात प्राधान्याने आणि मध्य भारतातील मोठ्या विस्तृत पट्ट्यात बोलली जाते. चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, अमरावती, नागपूर या जिल्ह्यांत व आंध्र प्रदेशच्या सीमेलगतही गोंडी बोली बोलली जाते.

भिल्ली बोलीभाषा गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थान या राज्यांमध्ये बोलली जाते. या बोलीवर त्या त्या राज्यांच्या प्रमाण भाषेचा प्रभाव असल्याने महाराष्ट्रात ती मराठीची बोलीभाषा म्हणून गणली जाते.

मराठवाडा प्रदेशात ही ठसकेबाज मराठी भाषा वापरली जाते. सहसा गावठी किंवा शिवराळपणा हे वैशिष्ट्ये मराठवाड्यातल्या मराठीचे समजले जाते. नांदेड जिल्ह्यात तेलंगणा राज्याला लागून असल्याने एक वेगळाच हेलका धरला जातो. तर महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील भागातील उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात थोडी वेगळी भाषा बोलली जाते. लातुरी भाषेत काही वेळा क्रियापदांवर कानडी भाषेचा परिणाम होतो. परंतु प्रभाव मात्र नाही. या भाषेत ऊर्दू शब्दही आढळतात. 'लाव', 'आव' या स्वरूपाचे कारकवाचक प्रत्यय या बोलीचे वेगळेपण दाखवतात. उदा. जेवलालाव, चाल्लाव, ठिवताव इत्यादी.

मराठी भाषा प्रत्यक्ष व्यवहारात वापरणे, मराठीविषयी सुलभ ज्ञान देणे, मराठी भाषेला वैश्विक स्वरूप देते. समाजाला तिची उपयोगिता पटवून देणे तसेच विविध मराठी साहित्य प्रकार लोकांपर्यंत पोहोचविणे अशा अनेक गोष्टींनी भाषा टिकून राहते. इतकेच नाही तर तिची प्रगती होते. त्यासाठी आपण मात्र प्रयत्नशील असावे लागते.

मराठी भाषा ही महाराष्ट्राचे ऐश्वर्य वाढविते. महाराष्ट्रातील लोक व येथील विविध भाषा व त्यांच्या उपभाषा म्हणजे महाराष्ट्राची संपत्ती आहेत. महाराष्ट्राला विविध बोलीभाषांमुळे गौरविण्यात आले आहे. बोलीभाषा या मानवी जीवनात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. हे यावरून सिद्ध होते. भाषा यांना ग्राह्य धरून जीवन जगणे सुलभ होते. त्या असतील तर व्यक्तींमध्ये होणारा अर्थपूर्ण संवाद कारणी लागतो.

◆◆◆

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक विचार

- **ज्योती राजेंद्र कदम**, बी.एस्सी. भाग-१

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे म्हणजे एक ध्येयवादी शिक्षक होते. त्याचे पूर्ण नाव गोविंदराव ज्ञानोजीराव साळुंखे. ९ जून १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील रामापूर या गावी जन्मलेले डॉ. बापूजी साळुंखे यांनी अनेक लोकांचे जीवन घडविले आहे. डॉ. बापूजी साळुंखे हे एक थोर दूरदर्शी शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली आहे. ही शिक्षण संस्था महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे. या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून जवळपास पाच लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

आज या संस्थेचे विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रात कला, क्रीडा, साहित्य, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत नावलौकिक प्राप्त करीत आहेत. डॉ. बापूजींच्या या शैक्षणिक कार्यात त्यांच्या पत्नी श्रीमती सुशिलादेवी साळुंखे यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळेच बापूजींनी अनेक ज्ञानशाखा उभ्या केल्या. आज विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रूपाने व शैक्षणिक विस्ताराने डॉ. बापूजींच्या स्मृती चिरंतन राहिल्या आहेत. डॉ. बापूजी साळुंखे यांनी हजारो वर्षे सामाजिक व शैक्षणिक प्रवाहातून बाजूला पडलेल्या समाजाला शिक्षणाची आणि स्वत्वाची जाणीव करून दिली. बुद्ध, कबीर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व आंबेडकरवादी विचारांचा वारसा समाजाला प्राप्त होऊन समाज विवेकी आणि विचारशील बनावा या हेतूने त्यांनी शिक्षण संस्था उभी केली. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये



भरीव स्वरूपाची कामगिरी केली आहे.

बापूजी साळुंखे यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. सत्यशिल, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा, त्याग, सेवा व प्रेम या मानवी गुणांचे ज्ञान शिक्षणाद्वारे होऊन त्याद्वारे एक सुसंस्कारक्षम नागरिक निर्माण व्हावा, अशी त्यांची अपेक्षा होती.

बालपणातच, बापूजींच्या आयुष्यातून मातृसुख आणि पितृसुख कायमचं हरवलं. बापूजी साळुंखे यांचे शिक्षण प्रतिकुल परिस्थितीत झाले होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे जीवन आणि कार्य महाराष्ट्राच्या शैक्षणिक

इतिहासातील सुवर्णकाळ ओळखला जातो. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावर महात्मा गांधी यांचा प्रचंड प्रभाव होता आणि म्हणूनच नातेवाईक व मित्र परिवार त्यांना बापूजी म्हणू लागले आणि संपूर्ण महाराष्ट्रात यांची बापूजी अशी ओळख निर्माण झाली. काही मित्रांच्या सहकार्याने त्यांनी शिक्षण घेतले.

बापूजींनी 'श्रीराम समाज सेवा मंडळा'ची स्थापना केली. या मंडळाच्या माध्यमातून त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी प्राथमिक शाळा व गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. डॉ. बापूजी साळुंखे यांचा महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील 'चले जाव' या चळवळीत देखील सहभाग होता.

बापूजींनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत, अध्यापक आणि मुख्याध्यापक म्हणून सेवा दिली होती. कोल्हापूर आणि चाफळ येथे वसतिगृहे सुरू करण्यात आली. ही तर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची फक्त सुरुवात होती. ही संस्था कमी कालावधीत महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यामध्ये विस्तारित गेली.

शिक्षणाचा प्रचार व प्रसार, ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार वाढविण्याच्या दृष्टिकोनातून ही संस्था उभारण्यात आली आहे. बापूजींच्या मते ज्ञान म्हणजे सत्य, चारित्र्य, अखंडता, शोषक प्रवृत्ती नष्ट करणे, सेवा आणि समर्पण होय. चांगुलपणा हा ईश्वराचा गुणधर्म मानला जातो. आपल्या शैक्षणिक संस्थांमध्ये चांगले चारित्र्य घडविणे यावर भर दिला गेला पाहिजे, अशी बापूजींची खात्री होती आणि म्हणूनच संस्थेची प्रार्थना 'हरे राम हरे कृष्णा' ही बापूजींनी स्वतः रचलेली आहे. बापूजींनी आपले संपूर्ण आयुष्य श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कार्यासाठी समर्पित केले होते.

बापूजींनी आपली वारस हक्कातील मालमत्ता या संस्थेच्या विकासासाठी दान केली. वेळोवेळी डॉ. बापूजी साळुंखे यांनी या संस्थेला मोठ्या प्रमाणात निधी देखील पुरवला आहे. डॉ. बापूजी साळुंखे यांना एक लाख ३७ हजार रुपये अशी गुरूदक्षिणा मिळाली होती. ही गुरूदक्षिणा त्यांनी संस्थेच्या खर्चासाठी दिली. बापूजी साळुंखे यांनी खेड्या-पाड्यांमध्ये दुर्गम भागामध्ये, आदिवासी आणि मागासलेल्या मुलांच्या शैक्षणिक, गरजा भागवल्या. त्यांनी केलेल्या ज्ञान प्रसार यामुळे त्यांना शिक्षणमहर्षी ही पदवी देण्यात आली. समाजातील दीन, दलित आणि गरीब समाजासाठी केलेल्या महान सेवेबद्दल आणि गरीब समाजासाठी केलेल्या महान सेवेबद्दल महाराष्ट्र शासनाने त्यांना 'दलित मित्र' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

स्वामी विवेकानंद हे भारतीय संस्कृतीचे आदर्श आहेत. ते सत्य, चारित्र्य, गौरव, त्याग, भक्ती, उदारता, अपेक्षा आणि ही शिक्षण संस्था महान संत श्री स्वामी विवेकानंद यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि शिकवणीचा आदर करत काम करते. त्यामुळे शिक्षण संस्था त्यांच्या नावावर उभारली गेली आहे आणि या संस्थेच्या यशाचे पूर्ण श्रेय डॉ. बापूजी साळुंखे यांना जाते.

उठा, जागे व्हा, आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका!

Arise! Awake! and Stop not until the goal is reached... असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले होते..

◆◆◆

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे विचार

**- स्वराज धनंजय लोंढे,** बी. एस्सी. भाग-२

'ज्ञान, विज्ञान आणि संस्कार' या महान सत्याचा अविष्कार होणे ही काळाची गरज आहे. माणसात दडलेले माणूसपण शोधून सुसंस्कारी जीवन जगण्याची संधी निर्माण करून देणे, हाच मानवधर्माचा प्रसार जगाच्या पाठीवर कोणालाच जमला नाही, तो इतिहास निर्माण करणारा महान शिक्षणप्रेमी म्हणून सारा समाज ज्यांच्याकडे पाहतो, ते माझे नव्हे तर सार्‍यांचे दैवत 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे' होत.

'ध्येयाचा ध्यास धरला की कामाचा त्रास होत नाही.' हे तत्त्व अंगीकारून 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' स्थापन केली. मूल्याधिष्ठित वैचारिक अधिष्ठान असलेली एकमेव संस्था अनेकांच्या जीवनात परिवर्तन करून गेली. 'नियोजनातच यश दडलेले असते' या बापूजींच्या विचारानेच संस्था वाटचाल करीत आहे. याच विचारांची गरज आपल्या आजच्या शैक्षणिक संस्कृतीमध्ये आवश्यक आहे.

हाती घेऊन शैक्षणिक क्रांतिची मशाल
ज्ञान, प्रकाश किरणांनी उजळला
महाराष्ट्र आसमंतात लालेलाल

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार''

शिक्षण प्रसार या ध्येय वाक्याला स्मरून 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' सन १९५४ सालापासून गेली साडेपाच तपाहून अधिक काळ अव्याहतपणे आणि पावित्र्याने शिक्षण प्रसाराचे कार्य करीत आहे. त्यासाठी त्यांनी ज्ञानाची गंगोत्री खेड्यापर्यंत पोहोचविली. बापूजींच्या शैक्षणिक विचाराची बैठक उदात्त आहे. विद्यार्थी शिक्षणातून सुसंस्कारीत झाला पाहिजे. बापूजींच्या ह्या विचाराची गरज आजच्या शैक्षणिक पद्धतीमध्ये आहे पण ते विचार आपणाला बघायला ही मिळत नाहीत. कारण आज शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. देशाची प्रगती व विकास हा शिक्षणावर वा शिक्षकांवर अवलंबून असतो. पुस्तकी शिक्षणाची व्यवहारी ज्ञानाशी फारकत हा आजच्या शिक्षण पद्धतीचा दोष आहे. म्हणून आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये डॉ. बापूजी साळुंखे यांचे विचार समजावून घेणे अत्यंत मोलाचे आहे.

डॉ. बापूजी साळुंखे म्हणायचे, शिक्षणाचा मूळ उद्देश माणसातील पूर्णत्व जागृत करणे आह आहे. स्वामी विवेकानंदांच्या तत्त्वानुसार मनुष्यामध्ये जे दैवत्व आहे. त्याचे उदात्तीकरण म्हणजे शिक्षण होय. या विचारांची आजच्या शिक्षणपद्धतीमध्ये गरज आहे. फक्त पुस्तकी ज्ञान दिल्याने विद्यार्थी सुसंस्कारीत होत नाहीत. त्यासाठी वेगवेगळे उपक्रम शाळेमध्ये राबविले पाहिजेत. ज्या पद्धतीने डॉ. बापूजी साळुंखे यांनी १२ जानेवारी ते १९ जानेवारी हा 'विवेकानंद सप्ताह' साजरा करण्याचे १९६४ सालापासून ठरविले व ते आज ही संस्थेच्या ३७१ शाखांमध्ये अविरतपणे चालू आहे. यामध्ये वेगवेगळ्या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, संधी मिळते. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व घडण्यास मदत होते.

''आधी वंदन गुरू चरण

तेव्हाच भेटती ज्ञान कण''

हे होते बापूजींचे विचार पण आजच्या शैक्षणिक संस्कृतीचा विचार केला तर गुरू-शिष्याचे नाते लोप पावत चालल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांचे वागणे पूर्णपणे बदलले आहे. विद्यार्थ्यांना शिक्षकांबद्दल आदर वाटेनासा झाला आहे. विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांचे शैक्षणिक विचार असे होते. ते म्हणायचे, ''आपण सुसंस्कार करून घेण्यासाठी शिकत आहेत ही पवित्र भावना विद्यार्थ्याने सदैव अंतःकरणात पूजली पाहिजे.'' 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' हा मौलिक विचार शिक्षणमहर्षी प. पू. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शिक्षण तत्त्वज्ञानातील आत्मा होता. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे नेहमी म्हणत, ''मी देशाला असे नागरिक देऊ इच्छितो की जे आत्मविकसित असतील आणि त्यांच्यात राष्ट्रीय विकासाची सक्रीय तळमळ असेल.'' जीवनाचा अर्थ विद्यार्थ्यांना अनुभवणारा उदात्त जीवन दृष्टिकोन डॉ. बापूजींच्या शिक्षण विचारांचा बळकट धागा होता.

डॉ. बापूजींच्या विचारामध्ये...
आत्मविश्वासाचा महामंत्र आहे.
शीलसंपन्नतेचा महामंत्र आहे.
त्यागाचा, समतेचा महामंत्र आहे
कर्मयोग आणि सुसंस्काराने
शिक्षण विचार धारणेचा महामंत्र आहे

या सर्व बापूजींच्या विचारांची आजच्या शिक्षण पद्धतीमध्ये गरज आहे. हे विचार असतील तरच आजची बदलत असणारी शैक्षणिक संस्कृती सुधारणार आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडणार आहे.

◆◆◆

# स्त्री भ्रूण हत्या

- **वैष्णवी साळुंके,** बी. एस्सी. भाग-२

स्त्री भ्रूण हत्या हा विषय तसा तुम्हा आम्हासाठी काही नवीन नाही. आजच्या काळात स्त्री भ्रूण हत्या झाल्याची बातमी आपण सर्वांनीच कधी ना कधी तरी वाचलेली, ऐकलेली किंवा पाहिलेली आहे. पण आपण ती बातमी फक्त तेवढ्यापुरती लक्षात ठेवतो. थोडेसे दुःख व्यक्त करतो आणि पुन्हा आपापल्या आयुष्यात व्यस्त होऊन जातो.

पण, मित्रांनो आपण सर्वांनी कधी गंभीरपणे हा विचार केलाय का? की, समाजात का होत आहेत या स्त्री भ्रूण हत्या? कोण आहेत ते लोक जे हे दुष्कार्य करीत आहेत? ते लोक दुसरे तिसरे कोणी नसून, आपल्याच आसपास वावरणारे आहेत आणि आजही वर्षानुवर्षे चालत आलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीला बढावा देत आहेत. हो खरे आहे हे!

स्त्री भ्रूण हत्या म्हणजे काय? तर स्त्री भ्रूण हत्या म्हणजे गरोदर असलेल्या स्त्रिच्या पोटातील बाळ हे जर मुलगी आहे असे निदान झाल्यास त्या स्त्रीचा गर्भपात करून तिच्या पोटातील बाळाची त्या मुलगीची हत्या घडवून आणण्यात येण्याची घटना आहे. अशा प्रकारच्या चाचण्या करून काही लोक असे गंभीर गुन्हे लपून छपून करीत असल्यामुळे आता गर्भलिंग चाचणी ही कायद्याने गुन्हा अहे असे नियम बनविले गेले आहेत. असे करताना जर कोणी दोषी आढळल्यास त्याला कठोरात कठोर शिक्षा होईल असे कायदे केले आहेत परंतु आपण जर या गोष्टीचा गंभीरपणे विचार केला तर वाटते की हे कायदे केल्यानंतरही खरंच का सगळीकडील स्त्री भ्रूण हत्या थांबल्या आहेत की अजूनही पडद्याआड कितीतरी मुली हे जग बघण्याआधीच मरण पावत आहेत?



स्त्री भ्रूण हत्या ही समस्या काही नवीन नाही आणि वर्षानुवर्षे अनेक ठिकाणी याचे प्रकार होतच आले आहेत. आपली संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती मानण्यात येत असल्यामुळे एखाद्या जोडप्याचे लग्न झाले की त्यांना होणारे पहिले अपत्य हे मुलगाच असले पाहिजे अशी कुटुंबीयांची इच्छा असते.

'मुलगा हा वंशाचा दिवा' अशी पिढ्यान्‌पिढ्या लोकांची धारणा झालेली आहे. स्त्री भ्रूण हत्या होण्यास आणखी एक महत्वाचे कारण म्हणजेच आपल्या समाजात पूर्वीपासून एक धारणा निर्माण केली आहे की, मुलगी हे परक्याचे धन आहे. मुलगी लग्न करून सासरी जाणार, ती आपल्याकडे कायमची राहणार नाही. आपल्या म्हातारपणाची काठी म्हणजे आपला मुलगाच असतो.

म्हणून प्रत्येक घरात एक मुलगा हवाच, अशी लोकांची समजूत चालत आलेली आहे.

आज जग झपाट्याने पुढे जात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यामुळे दिवसेंदिवस प्रगती होत आहे. कॉम्प्युटर, मोबाईल, टॅब, लॅपटॉपच्या या युगात आपण सर्वजण दिवसेंदिवस उत्क्रांती घडवत आहोत. अशावेळी मुलगा आणि मुलगी हा भेदभाव न ठेवता या बुरसटलेल्या विचारांना नवीन पिढीने मागे सोडले पाहिजे.

आज बहुतांश लोक मुलगा-मुलगी हा भेदभाव न करता जे अपत्य होईल त्याच्याकडे संपूर्ण लक्ष देऊन त्याला किंवा तिला चांगल्यात चांगले शिक्षण आणि संस्कार देऊन त्याचे किंवा तिचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्नशील असतात व आपल्या मुलांनाही चांगल्या प्रकारे स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी चांगला पाठिंबा देत आहेत. परंतु समाजाच्या अजूनही काही दुर्गम भागात किंवा काही वाईट मानसिकतेच्या उच्चभ्रू लोकांमध्येही स्त्री भ्रूण हत्या व मुलगा हवा हा हव्यास आहेच.

तेव्हा आपण जेवढे जमेल तेवढे आपल्या आसपास जर अशा प्रकारच्या घटना निदर्शनास आल्यास त्यांना वेळीच विरोध करून आळा घालण्यासाठी दक्ष राहिले पाहिजे. आपल्या इच्छेसाठी एका निष्पाप जीवाचा बळी घेणाऱ्या लोकांना चांगलाच धडा शिकविण्याची गरज आहे. कारण आज जर तुम्ही मुलीला जन्माला येऊ दिले नाही तर उद्याची माता, बहीण, पत्नी आणि मैत्रीण तुम्हाला कशी काय मिळेल? तेव्हा तिला जन्माला येऊ द्या.

मित्रांनो, मुलगा आणि मुलगी कोणीही असो फक्त ते बाळ निरोगी सुदृढ जन्माला यावे बस एवढीच अपेक्षा करावी आणि आपल्या या समाजाला गेली कित्येक वर्षे लागलेला स्त्री भ्रूण हत्येचा कलंक कायमचा घालवून टाकूया. ''मुलगी वाचवा, मुलगी शिकवा''

◆◆◆

# भारतीय संविधान आणि सामाजिक स्वातंत्र्य...

- **आदित्य शाम जाधव**, बी. ए. भाग-१



'स्वातंत्र्य' हा शब्द बहुचर्चित आहे. राज्यशास्त्र आणि समाजशास्त्रात त्यांची खूप मोठी व्याप्ती आहे. माणसाच्या चालण्या-बोलण्यात आणि वागण्याशी 'स्वातंत्र्य' हा शब्द निगडीत आहे. व्यक्ती स्वातत्र्याच्या व्यापकतेतून 'सामाजिक स्वातंत्र्य' जन्माला येते. सामूहिक परिवर्तनाची बीजे सामाजिक स्वातत्र्यात लपलेली आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी, या देशाने भारतीय संविधानाचा स्वीकार केला. तेव्हापासून व्यक्ती आणि सामाजिक स्तरावर खूप काही बदल झाले आहेत. ते आजही होत आहेत आणि उद्याही होतील. प्रस्तुत निबंधात आपण 'भारतीय संविधान आणि सामाजिक स्वातंत्र्य' यावर चिंतन करणार आहोत.

भारतीय संविधानाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी विदर्भातले प्रसिद्ध गझलकार नितीन देशमुख आपल्या गझलेत लिहितात की,

परंपरांचा भूलभूलैय्या नाचत होता माथी
उजेड सावज झाला होता, अंधारांच्या हाथी
तु सूर्याचे किरण होऊनी, आला उजेड द्याया
जय जय जय भीमराया रे, जय जय जय भीमराया...

गझलेतल्या या शब्दाप्रमाणे पंरपरेनं हजारो वर्षांपासून माणसं आणि समाजावर लादलेली गुलामी आणि कित्येक पिढ्यांच्या नशिबी असणारा अंधार दूर करणारा भारतीयांच्या आयुष्यातला दिवस म्हणजे २६ नोव्हेंबर १९५० होय. या दिवशी भारताने संविधानाचा स्वीकार केला. आणि हजारो वर्षांच्या परंपरेला हादरा बसला. मनुवादी विचाराला धक्का बसला. दलित-वंचित, शोषित, आदिवासीसह कोटयावधी माणसांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क आणि अधिकार मिळाला. संविधानाने एका झटक्यात माणसाला माणूसपण दिलं. नवी ओळख दिली. नवं नाव आणि नवं गावं दिल. म्हणूनचं वामनदादा

कर्डक लिहितात की, उधारली कोटी कुळे... भीमा तुझ्या जन्मामुळे...

'भारतीय संविधान आणि सामाजिक स्वातंत्र्य' हा विचार करीत असताना अनेक मुद्दे व बाबीचा विचार करावा लागेल. तसेच गेल्या ७० ते ७२ वर्षात भारतीय संविधानाने देशात साधलेले वैयक्तिक आणि सामाजिक परिवर्तन लक्षात घ्यावे लागेल. संविधानाने बहाल केलेल्या हक्क आणि अधिकारामळे झालेली सामाजिक घुसळण नीटनेटकी समजून घ्यावी लागेल. तेव्हाच सामाजिक स्वातंत्र्याचा नेमका बोध होईल. कारण भारतीय संविधान हा सामाजिक क्रांतीचा दस्तावेज आहे.

प्रख्यात विचारवंत हेरॉल्ड लास्की यांच्या मते व्यक्तीच्या स्वातंत्र्यात त्याचे विचार-स्वातंत्र्य, आचार-स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्यी आणि आर्थिक स्वातंत्र्य यांचा समावेश असतो. या स्वातंत्र्यांमुळे व्यक्तीला नैतिक आणि भौतिक या दोन्ही प्रकारचा विकास साधता येतो. अगदी तसच सामाजिक स्वातंत्र्याचीही असतं. समाजहित हा देखील स्वातंत्र्याचा एक महत्वाचा उद्देश असतो. केवळ मूठभरांच्या स्वार्थासाठी बहुसंख्यांकावर अन्याय होता कामा नये. राजकीय स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याचा एक भाग असेल. मात्र, सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य निरर्थक ठरेल, असे बाबासाहेबांनी म्हटले होते. ते आजही लागू पडते. जातीअंत, आर्थिक समता व स्त्री-पुरुष समतेसह सामजिक स्वातंत्र्य ही संकल्पनाच देशाला पुढे घेऊन जाऊ शकते.

मनुवाद्यांनी भारतीय समाजात वेगवेगळ्या जातसमूहांचे सोईनुसार वर्गीकरण करण्यात आले होते. प्रत्येकाची कामे आणि प्रत्येकाच्या वागण्या-बोलण्याची चौकट 'मनुस्मृती'ने ठरवून दिली होती. माणसाच्या सावलीचाही विटाळ वाटणारी व्यवस्था हजारो वर्षापासून नांदत होती. मंदिर आणि पाणवटेसुद्धा स्पशाने बाटतात असे सांगणारे लाखो 'मंबाजी' व्यवस्थेत हुकूमीपणा गिरवत होते. हि व्यवस्था चुकीची आहे. आणि प्रत्येक माणसाला मान-सन्मान



मिळाला पाहिजे, असं सांगणारा 'संविधान' नावाचा महाग्रंथ व्यवस्थेच्या छाताडावर पाय देऊन सामाजिक क्रांतीच्या दिशेने पाउले टाकणारा ठरला आहे. अनेक चुकीच्या प्रथा-परंपरांमुळे सामाजिक आव्हान उभे राहिले होते. त्यामुळे स्वातंत्र्या समता, बंधुता या मूल्यांची स्वातंत्र्य लढ्यानंतर अत्यंत आवश्यकता होती. सोबतच आर्थिक विषमता, सांस्कतिक, भाषिक, भौगोलिक विविधता, अंधश्रद्धा, शिक्षणाचा अभाव, मिळालेल्या स्वातंत्र्याचे रक्षण अशी अनेक आव्हाने आपल्यासमोर होती. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसूत्रीवर संविधानाची उभारणी केली गेली. संविधानाने नागरिकांना मुलभूत हक्क तर दिलेच, पण त्याचबरोबर त्यांच्या अंमलबजावणीसाठी त्याची घटनेमध्येच तरतूद करून दिली.

भारतात हजारो वर्षांपासून प्रचलित असणारी जातीय व धर्मीय विषमता, गलामगिरी, आणि उच्च-नीचत्वाची भावना नष्ट व्हावी या हेतूने डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधत्व, आणि धर्मनिरपेक्षता या गोष्टींना संविधानाच्या मूलभूत तत्वांचा दर्जा प्रदान केला. मूलभूत हक्कांचा सगळ्यात मोठा शत्रू भेदभाव आहे, असं आंबेडकरांचं मत होतं. त्यामुळे मूलभूत हक्कांची अमलबजावणी योग्य प्रकारे व्हायची असेल तर सर्व प्रकारचा भेदभाव नष्ट व्हायला हवा, असं त्यांना वाटायचं. तसं झालं नाही तर मूलभूत हक्कांना काही अर्थ नाही अशी त्यांची भूमिका होती. त्यामुळे

बाबासाहेबांनी संविधानात नागरिकांना सहा मूलभूत हक्क दिलेले आहेत. त्यामध्ये समतेचा हक्क कलम (१४ ते १८), स्वातंत्र्याचा हक्क (१९ ते २२), शोषणाविरुद्धचा हक्क (कलम २३ आणि २४), धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम २५ ते २८), सांस्कतिक व शैक्षणिक हक्क (कलम २९ त ३०), घटनात्मक उपाययोजनेचा हक्क (कलम ३२) अशी विभागणी करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता, अन्याय आणि असमानतेच्या विरुद्ध निरंतर लढा देऊन भारताला नागरी हक्क मिळवून दिले. भारतात लोकशाही नांदावी आणि सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा म्हणून त्यांनी अविरत प्रयत्न केले. भारतीय पुढाऱ्यांना डॉ. आंबेडकरांच्या कार्याचे महत्त्व आणि योगदान ज्ञात आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून संविधानिक शाश्वती आणि सुरक्षेचे नागरी स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, अस्पृश्यतेचे उच्चाटन आणि स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक अधिकाराविषयी त्यांनी आवाज उठविल. डॉ. आंबेडकरांनी आरक्षणप्रणालीचा अंगीकार करून नोकरीत, प्रशासकीय सेवा, शाळा आणि महाविद्यालयात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीला प्रतिनिधित्व मिळवून देवून समान मान्यतादर्शक कृती केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वातंत्र्याबाबतची संकल्पना केवळ ब्रिटिशांकडून राजकीय सत्ता खेचून आणणे एवढीच मर्यादित नव्हती. स्वातंत्र्य, समता, बंधुता यावर आधारीत जातीविरहित, वर्गविरहित आणि लोकशाहीप्रणीत नवसमाजाची निर्मिती हा त्यांचा ध्यास होता आणि तोच त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा मूलाधारही होता. बाबासाहेबांनी सत्तांतर होताना म्हटले होते की, आमच्यावर आजवर ज्याचा भयानक स्वरूपाचा आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक अंमल आहे, अशा लोकांकडे आता राज्यसत्तेचे हस्तांतरण होत आहे. अशावेळी गतकाळात आमच्यावर झालेल्या अत्याचाराची आणि दडपशाहीची तीव्रतेने आठवण होते. आणि स्वराज्यातही त्याची पुनरावृत्ती होईल, अशी भीती वाटते, पण तरीही स्वराज्य मिळालेच पाहिजे. आशा आहे आमच्या देशबांधवांबरोबर आम्हालाही सत्तेत योग्य तो वाटा मिळेल? डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेतील स्वातंत्र्य आता खरोखरच अस्तित्वात आले आहे काय? हा प्रश्न आहे.

स्वातंत्र्याची फळे दलितवर्गाच्या वाट्याला आलीच नाहीत असे नाही. ती जरूर आली. म्हणजे स्वातंत्र्यात टलितांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले, दलित समाजाचा नोकऱ्यांत प्रवेश झाला, कायद्याने अस्पृश्यता हा गुन्हा ठरवण्यात आला, सामाजिक अन्याय, अत्याचाराविरुद्ध आवाज उठवण्याचा अधिकार मिळाला. दलित समाजातून आयएएस, आयपीएस अधिकारी तयार झाले. बसपा नेत्या मायावती मुख्यमंत्री झाल्या. काही आमदार, खासदार आणि मंत्री झाले, कुणी कुलगुरू तर कुणी विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष झाले. काही नियोजन मंडळाचे सदस्य होऊन पंतप्रधानांच्या मांडीला मांडी लावून बसू लागले. सांस्कृतिक बदल होताना दलित साहित्यिकांचा मानसन्मान वाढला. पण स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही दलित समाजावरील अन्याय आणि अत्याचार थांबले नाहीत, हे वास्तव आहे. दलितांचा कुठलाही गुन्हा नसताना त्यांना गुन्हेगारासारखी वागणूक देणारी पाशवी वत्ती आजही गावखेड्यामध्ये डोके वर काढीत असते. त्याची हजारो उदाहरणे देशासह फुले, शाहू आणि आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात सापडतील.

संविधानाने अनुसुचित जाती-जमातींना दिलेले आरक्षण, त्यानंतर बी. पी. मंडल आयोग आणि त्याने नमुद केलेली इतर मागास वर्गीयांसाठीही असलेली आवश्यकता, तो लागू केल्याचा निर्णय, त्यावर इंद्रा साहनी याचिकेतील इतर मागासवर्गीय आरक्षण संविधानिक असल्याचा निर्वाळा आणि इतर मागास वर्गीयांसाठी 'केंद्रीय शैक्षणिक संस्था (प्रवेश आरक्षण) २००६' द्वारे अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांना दिले गेलेले आरक्षण, सामाजिक आणि आर्थिक मागासलेल्या कुटुंबातील मुलांसाठी 'मोफत आणि अनिवार्य शिक्षण हक्क

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतकऱ्यांविषयी विचार

**- प्रतिमा राजा जगताप**, बी. एस्सी. भाग-१

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बुद्धीजीवी होते. आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावर त्यांनी समाजामध्ये अनेक अमूलाग्र बदल घडवून आणले. डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तित्वाचे अनेक पैलू आहेत. त्यांचे ते पैलू समाजासाठी न्याय हक्क जोपासणारे आहेत. त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करत भारतातील दीन, दलित, समाजात क्रांती करत त्यांना प्रवाहात आणले. त्यामुळेच भारतातील कोट्यवधींच्या संख्येने असलेला मूकसमाज, बहिष्कृत समाज आज स्वाभिमानाने जीवन जगत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे देशाच्या जडणघडणीत अफाट योगदान आहे. भारतीय संविधानातून त्यांचे विविध राज्यांची, प्रदेशांची भाषा व सांस्कृतिक जीवन भिन्न असतानाही या सर्वांना एकत्र आणले. त्यामुळेच आज भारतात लोकशाही टिकून आहे. देशाचा अमृत महोत्सव सुरू असताना शेवटचा माणूस आज प्रवाहात येतो आहे. डॉ. बाबासाहेबांनी जसा दलित व स्त्रियांचा उद्धार केला तसाच शेतकऱ्यांचाही केला आहे. या लेखामध्ये त्यांचे शेतकऱ्यांविषयीचे कार्य सांगण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भर हा सामाजिक न्यायावरच होता.

भारत देश हा कृषीप्रधान तर आहेच परंतु अनेक लोकांचे कृषीजीवन हे शेतीवर अवलंबून आहे. भारतातील अनेक लोक हे खेडेगावांत राहतात. शेतकरी व कष्करी हे ग्रामीण भागात राहतात. शेतकऱ्यांचा विकास झाला तर ग्रामीण जीवन भक्कम होईल त्यामुळेच त्यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. स्वतंत्र भारत देशातील ग्रामजीवनाचा स्तर उंचावण्यासाठी शासन जे जे प्रयत्न करील, त्याचा पाया सामाजिक न्याय हाच असला पाहिजे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा व कल्पना होती. त्यासाठी त्यांनी गावातील प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यावर होणारा अन्याय व त्यांची होणारी पिळवणूक दूर करण्यासाठी त्यांच्या हिताचे कायदे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषि विषयक विचार देशाला व देशातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत.

डॉ. बाबासाहेबांची कल्पना अशी होती की, औद्योगिकीकरण आणि शेती यांचे अतूट नाते असले पाहिजे. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवायचे असेल, त्यांना सक्षम करायचे असेल तर त्यांच्या शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभे केले पाहिजेत व यातूनच शेतकरी व कष्टकरी मजूर यांचा विकास झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेबांा भर हा स्वालंबनावर अधिक होता. शेतकरी, शेतमजूर हे आजपर्यंत वंचिताचे जीवन जगत आले आहेत. त्यांना अग्रक्रम देऊन न्यायिक पद्धतीने त्यांच्यासाठी कार्यक्रम आखायला पाहिजे. असे त्यांनी वारंवार विचार मांडलेले आहेत.

इंग्रज भारताची लूट कशी करतात हे तर त्यांनी प्रबंधातून संशोधन करून मांडलेच आहे. यासंदर्भात त्यांनी ब्रिटिश सरकारला परखडपणे खडे बोल सुनावले होते की, भारतावीरल कर्जाचा बोजा काही अंशी तरी शिरावर घ्यावा. आपल्या विश्लेषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''१९५८च्या कायद्यापासून लाभ होईल तो इंग्लडच्या खिशात आणि कर्जाचा डोंगर भारताच्या डोक्यावर'' शेतकऱ्याविषयींचे हे बाबासाहेबांचे विचार प्रखर, राष्ट्रीय बाण्याचे प्रतिकच होते. या विचारांतून त्यांची शेतकऱ्यांविषयी तळमळ दिसून येते. कोकणातील शेतकऱ्यांवर खोती पद्धतीमुळे खूपच अन्याय होत होता. त्यामुळे शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिती खूपच वाईट असायची. शेतकऱ्यांतील स्वाभिमान, हिंमत ही खोतांनी

कायदा २००९ द्वारे २५ टक्के राखीव जागा असा सामाजिक समतेसाठी प्रवास चालू आहे.

संविधानातल्या तरतुदीमुळे अनेक कुप्रथा आणि रूढी-परंपराना छेद मिळाला आहे. काही सनातनी प्रथा बंद करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. मात्र तरीही जिथे-जिथे अल्पसंख्याक समाज आहे तिथे-तिथे बहुसख्याक समाजाकडून त्यांच्या हक्क आणि अधिकारांची पायमल्ली होत असते. त्यामुळे सामाजिक स्वांतत्र्याची मजिल अजून बाकी आहे, असेच म्हणावे लागेल. म्हणूनच की, 'स्वातंत्र्यता' हे कुण्या गाढवीनीचं नाव आहे? असा प्रश्न पद्मश्री नामदेव ढसाळांनी इथल्या व्यवस्थेला विचारला होता. असे प्रश्न विचारणारेही खूप आहेत. मात्र उत्तरे देणारी व्यवस्था अद्यापही सापडलेली नाही. कारण प्रश्नांची उत्तरे ज्यांनी दिली पाहिजेत, ते सत्तेची फळे चाखत बसलेले आहेत. त्यांची हकूमशाही चालू आहे आणि तीचं प्रवृत्ती सामाजिक स्वातंत्र्याला अडचण ठरते आहे. लोकांनी काय खावं? काय प्यावं? काय नेसावं? हे ठरविणारे महाभाग सुध्दा वाढलेत आणि राष्ट्रभक्ती म्हणजे काय? असंही सांगणारे 'स्वयघोषित' अभ्यासक सध्या जोमाने वाढताहेत. जादे आणि हरामजादे हा वादही सामाजिक स्वातंत्र्याच्या प्रक्रियेचा गतिरोधक ठरतो आहे.

बाबासाहेबांचं गाणं लावलं म्हणून साईच्या शिर्डीत एका तरूणाला जीवंत मारलं गेलं. केवळ पोरीकडे पाहायाचा म्हणून खर्डातल्या नितीन आगेचा खून करण्यात आला. सोनाई, जवखेड सुद्धा यापेक्षा वेगळ नाही. म्हणूनचं सामाजिक एकात्मतेच्या गप्पा या फक्त आणि फक्त कागदावरचं राहाताहेत, हे मात्र नक्की. या देशात गेल्या ७५ वर्षात केवळ दलितांवरचं अत्याचार झालाय असे नाही, तर ओबीसी आणि भटके सुद्धा अन्याय आणि अत्याचाराचे बळी ठरले आहेत. मागे धुळे जिल्ह्यात चोर समजून मारण्यात आले होते. अशी हजारो उदाहरणे सहजपणे सांगता येतील, ज्यामुळे सामाजिक स्वातंत्र्याच्या प्रवासावर प्रश्नचिन्ह उभे राहील.

स्वातंत्र्यात दलितांना मिळालेल्या शैक्षणिक सुविधा, नोकऱ्यांतील आरक्षण यामुळे दलित समाजाचा काही प्रमाणात आर्थिक विकास जरूर झाला. याचा अर्थ उभ्या दलित समाजाचा आर्थिक स्तर उंचावला, असा मात्र नव्हे, जागतिकीकरण, खासगीकरणाच्या चक्रात दलित वर्गाच्या जीवन-मरणाचे प्रश्न उग्र होत आहेत. खासगीकरणामुळे आरक्षणही आता संपुष्टात येत चालले आहे. सरकारकडून अल्पदराने भूखंड, पाणी, वीज मिळवायची आणि खासगी उद्योग-धंद्यातून दलित, मागासवर्गीयांना आरक्षण ठेवायचे नाही, असा खासगीकरणाचा दलितविरोधी पवित्रा आहे. दुसरीकडे आरक्षण अजून किती काळ चालवणार, हा प्रश्न असतो. गुणवत्तेच्या गप्पा करण्यात येतात. पण लाखो रुपयांचे डोनेशन भरून जे डॉक्टर, इंजिनिअर होतात, त्यांची गुणवत्ता काय लायकीची असते? याची मात्र फारशी चर्चा कधीच होत नाही. आदिवासी, भटक्या विमुक्तांच्या दारी तर स्वातंत्र्याची किरणे किरणे अजूनही पोहोचली नाहीत. स्वातंत्र्यात स्त्रियांचा दर्जा किती नगण्य आहे ते जातपंचायतीच्या दहशतीने अलीकडेच अधोरेखित केले आहे. दलित वर्गाला स्वातंत्र्याची सुखद फळे मिळून समता, स्वातंत्र्य बंधूभाव आणि न्याय जोपासला गेला पाहिजे. तेव्हाच समाजाची वाटचाल ही सामाजिक स्वातंत्र्याकडे होईल, असे मनोमन वाटते.

शेवटी नितीन देशमुख यांच्या शब्दांत इतकंच की,

तु घटनेचा दिवा उजाळला<br>
तिमीर लाजून गेला,<br>
वेशीवरल्या दगडांना<br>
तु अमृत पाजून गेला,<br>
दे शक्ती दे...<br>
या दगडांचे सुंदर शिल्प घडाया<br>
जय जय जय भीमराया रे<br>
जय जय जय भीमराया रे....

◆◆◆

नष्ट केली होती. सरकारची देणी शेतकऱ्यांनी देऊनही पुन्हा खोतांची देणी द्यावी लागायची. खोत कुळाकडून पैसे उकळत असे. त्यामुळे शेकऱ्यांवर कराचा अधिक बोजा पडायचा. कुळांनी रीतसर पैसे भरले तरी तो पावती देत नसे. खोत जर सुलतान असेल तर सुलतानांचा गावावर जुलूम व्हायचा. खोत ब्राह्मण असेल तर शेतकऱ्यांच्या परसातील फमस, भाज्या यावर अधिकार त्यांचाच, शेतकऱ्यांना भाज्याही खाता येत नसत. खोत मराठा किंवा मुसलमान असेल तर कुळातील शेतकऱ्यांच्या कोंबड्याही फस्त करत. म्हणजेच खोती पद्धतीमुळे शेतकऱ्यांना हक्क, अधिकार, स्वामित्व काहीच नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेकऱ्यांविषयी आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे, दामोदर नदी प्रकल्प होय. हे कार्य म्हणजे एक राष्ट्रीय महान कार्यच आहे. १९४४ सालात बंगाल सरकारने स्थापन केलेल्या दामोदर नदी पूर चौकशी कमिटीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरच भारत सरकारचे मजूर प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. त्यावेळी कमेटीसमोर त्यांनी केलेले भाषण शेतकऱ्यांच्या हिताचे ठरले. दामोदर नदीला नेहमी पूर येत असे व हजारो लोकांचे प्राण जात असे आणि लाखो रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान होत असे. शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट होत असे. हा पूर शेतकऱ्यांच्या नेहमीच पाचवीला पूजावा तसाच होता. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, ''जलमार्ग आणि रेलमार्ग यात काहीच फरक नाही. सत्याची आपण पुरेपूर दखल घेतली नाही आणि जर का रेलमार्ग हा राज्यानुसार विभागला जाऊ शकत नाही तर जलमार्ग कोणत्याही हालतीत राज्याराज्यांमध्ये विभागला जाऊ शकत नाही. याच्या उलट आपण आपल्या घटनेला जलमार्ग, यात फरक करण्याचा हक्क दिला आहे. त्यामुळे रेलमार्ग तर केंद्रीय समजले जातात पण जलमार्ग हे राज्याचे समजले जातात आणि या चुकीचे खूप सारे वाईट परिणाम दिसून येतात.''

कृषिप्रधान देशात पाणी आणि विद्युत याचा पुरवठा व समतोल असेल तर सर्वांगीण फायदा होईल पाणी आणि वीज याविषयी डॉ. बाबासाहेबांची भूमिका धोरण समजून घेऊन जर उपाययोजना केल्यातर आजही खरोखरच ग्रामीण भारत समृद्ध होईल. डॉ. बाबासाहेबांचे पाणी आणि वीज याविषयीचे विचार म्हणजे देशातील राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठीचे महत्त्वाचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतकऱ्यांविषयी धोरण राज्यकर्त्यांनी आजही समजून घेतले तर शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास होईल यात शंक नाही. बाबासाहेबांचे विचार हे सामान्य माणसाला प्राप्त करून देणारे आहेत. दलित माणसातला स्वाभिणान जपण्यासाठी व त्यांची प्रगती व्हावी यासाठी महारवतन पद्धतीच त्यांनी नष्ट केली. शेतकऱ्यांचा स्वाभिमान जपण्यासाठी त्यांनी खोती पद्धती नष्ट केली. दामोदर नदी प्रकल्पांच्या माध्यमातून तमाम भारतातील शेतकऱ्यांसाठी धोरण ठरविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी, वीज धोरण हे शेतकऱ्यांसाठी एक वरदानच आहे. बंगालमधील दामोदर नदीचा पूरप्रश्न सोडविण्यासाठई डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ''पूर येऊ नये, म्हणून पाण्याचाही उपयोग व्हावा, यासाठीच त्यांनी दामोदर नदी प्रकल्पाला मान्यता दिली. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना फायदा झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतकऱ्यांविषयीचे विचार समजून घेतले त्यांचे धोरण समजून घेतले आणि आजही देशातील विविध राज्यांत नदीजोड प्रकल्प हाती घेतले तर... पाण्याचा प्रशन सुटायला मदत होईल. आज महाराष्ट्र राज्यात पाणी अडवण्याची खूपच गरज आहे. त्यासाठी निट नियोजन केले तर जल व्यवस्थापन केले तर शेतकऱ्यांना शेतीला पाणी मिळेल आणि शेतकऱ्यांची उन्नती होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या बुद्धीच्या बळावर, प्रचंड अभ्यासातून या देशातील महिला, दलित, वंचित यांना प्रवाहात आणले तसेच शेतकऱ्यांसाठई त्यांनी काम करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. आजही शेतकऱ्यांबद्दल धोरण आखताना बाबासाहेबांच्या शेतकऱ्याविषयी धेरणाला दृष्टीआड करून चालणार नाही.

◆◆◆

# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**- सत्यभामा शिवाजी निंबाळकर,** बी. कॉम. भाग-१

''**एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार,**
**गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार**''

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला ब्रिटिश साम्राज्यातून स्वातंत्र्य मिळाले. १५ ऑगस्ट २०२२ रोजी, आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्यलढ्याची आठवण करून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाची सुरुवात केली. ही सुरुवात महात्मा गांधींच्या साबरमती आश्रमापासून १२ मार्च २०२१ पासून ७५ आठवड्यांसाठी करण्यात आली. अर्थात पुढील दोन वर्षे भारत देश अमृत महोत्सव साजरा करीत राहील. स्वाभिमान आणि स्वातंत्र्यानंतर आपला देश सातत्याने स्वावलंबनाच्या मार्गावर पुढे जात आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त सुरू झालेला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हे स्वावलंबनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. जे भारत सरकारने ७५ आठवडे म्हणजे १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात मिठाचा सत्याग्रह हा निर्णायक क्षणांपैकी एक आहे. याचा दांडीयात्रा म्हणून इतिहासात उल्लेख केला जातो. म्हणूनच महात्मा गांधीजींच्या साबरमती आश्रमातून या महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असताना देशातील ७५ ठिकाणी स्वातंत्र्य लढ्यातील ७५ अनेक महत्त्वाच्या घडामोडी या माध्यमातून आजच्या पिढीसमोर ठेवल्या जाणार आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हा भारतातील प्रत्येकाच्या मनातील उत्सव असावा यासाठी हा उत्सव साजरा करण्याची जबाबदारी भारत सरकार बरोबर आपल्या सगळ्यांवर सोपविली आहे. कोणताही संकल्प हा उत्सवाशिवाय यशस्वी होत नाही. जेव्हा एखादा संकल्प उत्सवाचे रूप धारण करतो तेव्हा त्यात लाखो लोकांचे संकल्प जोडले जातात.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या आयोजनामध्ये स्वातंत्र्यलढ्याचे महत्त्व त्या मागील त्याग हे सगळे अनुभवता येईल देशातील सर्व हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली जाईल आणि त्यांच्या स्वप्नातील भारत घडवण्याचा संकल्प केला जाईल तसेच या कार्यक्रमातून आपल्या देशआची ७५ वर्षातील कामगिरी संपूर्ण जगासमोर सादर केली जाईल. या सर्वांचा विचार करून अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी भारत सरकारने रूपरेषा पाच स्तंभाच्या आधारे तयार केली आहे. ती म्हणजे स्वातंत्र्यलढा ७५ वर्षांच्या कल्पना, ७५ वर्षातील कामगिरी, ७५ वर्षांतील विविध कामे व ७५ वर्षातील कामगिरी या सर्वांमध्ये आपल्या देशातील सर्व लोकांच्या भावना समाविष्ट आहेत.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ११ ते १७ ऑगस्ट दरम्यान 'हर घर झेंडा' अभियानाअंतर्गत प्रत्येक घरी ध्वजवंदन करून आपल्या देशाविषयी कृतज्ञतापूर्वक स्मरण केले जाणार आहे. ७५ वर्षांच्या प्रवासात एक-एक पाऊल पुढे टाकत आपला देश इथपर्यंत पोहोचला आहे. भारत सध्याच्या स्थितीत जगातील सहावी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि पुढील वर्षात इंग्लंडला मागे टाकत पाचव्या क्रमांकावर जाण्याची आशा आहे.

आपला देश हा विकासाच्या उत्तुंग पातळीवर पोहोचला आहे. यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्यांना स्मरून आपला देश स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरा करीत आहे. हा अमृत महोत्सव साजरा करून भारताचा अभिमान संपूर्ण जगासमोर ठेवत आहे.

◆◆◆

# मराठी भाषा काळाजी गरज

- **सचिन व्यंकट वाघमारे,** बी.कॉम. भाग-२

२७ फेब्रुवारी या तारखेला कविवर्य विष्णु वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो... एखादा दिवस साजरा करणे खूप सोपं असतं... पण आपण खरोखर आपली मातृभाषा टिकावी म्हणून काही प्रयत्न करतोय का? किंवा करायला हवेत का? तर कोणते प्रयत्न करायला हवेत? हजारो वर्षापूर्वी लिहिला गेलेला श्रवणबेळगोळ येथे गोमटेश्वराच्या पुतळ्याखाली मराठी भाषेतील पहिला शिलालेख आढळतो तर मराठीतील आद्यग्रंथ म्हणून 'ज्ञानेश्वरी'चा उल्लेख आढळतो.

मातृभाषेचे महत्त्व ओळखून ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेतील भगवद्गीता प्राकृत भाषेत अनुवादीत केली. मातृभाषेबद्दल असणारा आदरभाव व्यक्त करताना ज्ञानेश्वर म्हणतात, ''माझा मऱ्हाटीची बोलू कवतुके परी अमृतांतेही पैजेसी जिंके'' मराठी ही इंडोयुरोपीय भाषा कुळातील एक भाषा आहे. भारतातील प्रमुख २२ भाषांपैकी मराठी एक आहे. महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा लोकसंख्येनुसार मराठी ही जगातील पंधरावी व भारतातील चौथी भाषा आहे. मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या ९,००,००,००० आहे. मराठी भाषा ९व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतमधून निर्माण झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे.

''लाभले आम्हांस भाग्य, बोलतो मराठी।''

हो मराठी बोलतो किंबहुना ती बोललीही जाते; परंतु वर्षभरातून फक्त एक दिवसच म्हणजे २७ फेब्रुवारीला कारणही तसेच आहे. अगदी जगभरातील मराठी भाषांकडून २७ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. मराठी कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने हा दिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा करण्याची प्रथा सुरू केली. जागतिक मराठी अकादमीने याकामी पुढाकार घेतला.

कवी कुसुमाग्रज यांच्याबद्दल आजच्या पिढीला ठाऊक नसल्यामुळे कदाचित हाच दिवस ''मराठी भाषा दिवस' म्हणून का साजरा करायचा. असा एक साधा प्रश्न त्यांच्या मनामध्ये कुठंतरी दडलेला असतो. खरंतर कवी कुसुमाग्रज यांचा व्यासंग इतका मोठा आहे की, त्यांच्याबद्दल काय बोलावे. विष्णू वामन शिरवाडकर हे एक मराठी कवी, नाटककार व कादंबरीकार होते. त्यांची नटसम्राट, दुसरा पेशवा ही गाजलेली नाटके तसेच कल्पनेच्या तीरावर जान्हवी या कादंबऱ्या आणि किनारा विषाखा, मराठी माती हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. यापैकी 'विशाखा' हा काव्यसंग्रह आधुनिक मराठी काव्याचे कायमचे भूषण आहे. शिवाय १९६४ मध्ये गोव्याच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपददेखील त्यांनी भूषविले होते. कुसुमाग्रजांना मराठी भाषेतील साहित्याचा 'कोहिनूर' म्हणूनही संबोधले जाते.

अनेक मराठी भाषिक, मराठी भाषा दिवस साजरा करतात खरा; परंतु खूप क्वचित जणांनाच हे ठाऊक असेल की, जगभरातील बऱ्या भाषांचा उगम हा जसा संस्कृत भाषेपासून झाला आहे. तशीच आपली मराठी भाषादेखील संस्कृत भाषेमधून आली आहे. लहान मुल जेव्हा जन्माला येते, तेव्हा आपल्या आईची, आपल्याला सभोवताली

असलेल्या भाषेची त्याला ओळख होते. त्या भाषेचे त्यांच्यावर संस्कार होतात. महाराष्ट्रातील बहुतांश लोकांची मराठी भाषा ही मायबोली आहे. सर्व महाराष्ट्राची मराठी भाषा एक असली तरीही मराठी भाषा दर बारा कोसावर बदलते. प्रत्येक प्रांताची निराळी भाषा आहे. लेखी भाषा तीच; परंतु बोलीभाषेत फरक जाणवतो. मराठी भाषेतसुद्धा वेगवेगळे प्रकार जावतात. जसे की कोकणची कोकणी भाषा वेगळी आहे मराठी भाषा ही लवचिक आहे. थोड्या थोड्या फरकाने ती वेगळी भासते. अलीकडे मराठी भाषा ही शुद्ध मराठी भाषा राहिली नाही. त्यामध्ये हिंदी आणि इंग्रजी भाषाही मिश्रीत झाल्या आहेत. अनेक खेड्यांमध्ये रोज बोलली जाणारी मराठी भाषा ही जरी अशुद्ध आणि रांगडी असली तरीदेखील कुठेतरी ती भाषा आपली वाटते. एक आपलेपण जाणवते. त्यामध्ये अलीकडे हिंदी किंवा इंग्रजी शब्द वापरले जातात. तरुण पिढी मोठ्या प्रमाणात इंग्रजी भाषेकडे आकर्षित होत आहे. त्यामुळे उच्च शिक्षणासाठी हे लोक परदेशात जातात आणि त्या देशातील बोलीभाषेलाच आपली मातृभाषा समजून अगदी मायदेशी परतल्यावरही त्याचा सर्रास वापर करतात. कुठेतरी इंग्रजी भाषेचे वर्चस्व मराठी भाषेवर प्रस्थापित झालेले दिसून येते. त्यामुळेच आज समाजामध्ये मराठी भाषेला प्रतिष्ठित भाषेचा दर्जा अजूनही मिळाला नाही.

◆◆◆



# तुमचे उज्ज्वल भविष्य तुमच्याच हातात

- **मयुरी महादेव मुळुक,** बी. कॉम. भाग-१

मुंगी खरे तर फार छोटी असते. पण ती निरंतर आपल्या कामात गुंतलेली असते, हे आपण बघतो. तिच्यात आणखी एक फार मोठा सद्‌गुण असतो. जर तिच्यासमोरे साखर आणि वाळूचे मिश्रण असेल तर ती त्यातून फक्त साखर वेचून घेईल व वाळू जिथे आहे तिथेच ठेवून देईल. मुंगीला बरोबर कळते की तिच्या हिताचे काय आहे आणि निरुपयोगी किंवा हानिकारक काय आहे. ती दोन्हीतून योग्य ती निवड बरोबर करते.

याचप्रमाणे ज्या मनुष्याला मुंगी प्रमाणे योग्य आणि अयोग्य काय आहे ते कळते व जो योग्य ते जीवनात उतरविण्याचा आवर्जुन प्रयत्न करतो व अयोग्य ते सोडतो, तो यशस्वी होतो. ज्याला हे जमत नाही किंवा आळशीपणाने त्यासाठी प्रयत्न करीत नाही तो स्वतः नष्ट होतो व इतरांचेही नुकसान करतो.

अर्जुन हे महाभारतातील एक मुख्य व्यक्तीत्व आहे. तो पाच पांडवांमधील मधला होता. भगवान श्रीकृष्णांचा अत्यंत प्रिय मित्र होता. युद्धकलेत कौरव-पांडव या दोन्ही पक्षात अद्वितीय होता. याशिवाय इतरही अनेक सद्‌गुण त्याच्या अंगी होते. त्यासाठी त्याने अत्यंत कठोर परिश्रम केले होते. अर्जुनाच्या विद्यार्थी जीवनातील खालील गोष्टी कदाचित तुम्हाला माहीत असतील -

गुरू द्रोणाचार्यांकडे कौर-पांडवांकडील व इतरही राजघराण्यातील राजकुमार शिक्षण घेत होते. धुनर्विद्येतील कौशल्य आपल्या शिष्यांनी किती आत्मसात केले आहे. हे आजमावून पाहण्यासाठी गुरू द्रोणाचार्यांनी एकेदिवशी त्यांच्या सर्व शिष्यांची परीक्षा घेतली.

काही अंतरावर एक झाड होते. त्या झाडावर ठेवलेल्या लाकडी पक्षाचा उजवा डोळा नेम धरून फोडावयाचा होता. प्रत्येक शिष्याने नेम धरल्यावर गुरू त्याला विचारायचे की, त्याला काय दिसते. प्रत्येकानेच उत्तर दिले की, त्या डोळ्याशिवाय इतरही सर्व गोष्टी त्याला दिसतात. अर्थातच गुरूंनी त्या सर्वांना बाण सोडण्यास मनाई केली. अर्जुनाला जेव्हा तोच प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्याने उत्तर दिले की, पक्षाचा उजवा डोळा सोडून त्याला इतर काहीही दिसत नाही. गुरूंनी त्याला बाण सोडण्यास परवानगी दिली आणि अर्जुनाचा नेम मुळीच चुकला नाही हे सांगणे नकोच.

वर्षापूर्वीच्या महाभारत काळात आजच्या सारख्या कृत्रिम उजेडाची सोय नव्हती. त्यामुळे अर्जुनाला रात्रीच्या अंधारात बाण चालविण्याचा अभ्यास सराव करणे शक्य नव्हते. अमूल्य वेळ वाया जात असल्यामुळे अर्जुनाला खूप खंत वाटायची पण याबाबतीत करण्याजोगा काही उपायच नव्हता. एकदा रात्री अर्जुन आपल्या कुटीत बसलेला असताना कुटीच्या दुसऱ्या एका अंधाऱ्या कोपऱ्यात त्याला काही हालचाल व आवाज होत असल्याचा भास झाला. उंदीर वगैरे असेल असे समजून त्याने थोडा वेळ तिकडे दुर्लक्ष केले. परंतु नंतर त्याचे कुतुहल जागृत होऊन जवळ जाऊन बघतो तो त्याला दिसले की, त्याचा मोठा भाऊ भीमसेन अंधारात बसून खीर खात होता. अर्जुनाने त्यास विचारले, ''अंधारात बसून खीर खाणे तुला कसे काय जमते?'' त्यावर भीमाने उत्तर दिले, ''का त्यात अशक्य ते काय?'' अर्जुनाच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. त्याच्या मनात आले की, अरेच्या खरेच की आपण रात्रीचा वेळ अभ्यासाविना उगाच वाया घालवितो.

रात्री पण अंधारात अभ्यास करणे शक्य आहे. अर्थातच त्या दिवसापासून अर्जुनाने रात्रीपण बाण चालविण्याचा सराव करणे सुरू केले व पुढे जाऊन तो सर्वोत्तम व अजिंक्य धनुर्धारी म्हणून विख्यात झाला.

स्वामीजी म्हणतात, मनुष्य व पशु यांच्यातील भेद हा आहे की, मनुष्याच्या ठिकाणी एकाग्रतेची शक्ती पशुंपेक्षा अधिक असते. मनुष्या-मनुष्यामधील भेद देखील त्यांच्यातील एकाग्रतेच्या शक्तीतील भेदामुळे होतो. निकृष्ट मनुष्याची श्रेष्ठ मनुष्याशी तुलना करून पाहा त्यांच्यातील भेद एकाग्रतेच्या शक्तीतील प्रमाणाचा आहे. त्यांच्यात हाच काय तो भेद आहे.

वारंवार प्रयत्न करण्याला अभ्यास असे म्हणतात. मित्रांनो लक्षात ठेवा की, अभ्यासाने सर्वकाही साध्य होते. खालील गोष्टींवर विचार करा. त्यात यश मिळविण्याचा खूप प्रयत्न करा. तुम्हाला ते जितके जमेल तितके तुमचे भविष्यच उज्ज्वल होईल.

१) प्रत्येक गोष्ट वेळच्या वेळी : घड्याळाचे काटे जसे २४ तास आखून दिल्याप्रमाणे फिरतात त्याप्रमाणे तुम्हाला २४ तासाला करा. वयाच्या गोष्टीची आखणी करावयाची आहे. तुमचे २४ तासांचे वेळापत्रक तयार करा. गरज भासल्यास मोठ्यांची मदत व मार्गदर्शन घ्या. एकदा वेळापत्रक तयार झाल्यावर शक्य तितके त्यानुसार प्रत्येक गोष्टींच्या वेळा पाळण्याचा प्रयत्न करा. मोठ्यांची आई, वडील, भाऊ, बहीण, इत्यादींची मदत घेतली तर तुम्हाला ते सोपे जाईल. तुम्ही असे काही दिवस चिकाटीने आणि तंतोतंत केले की, तुमच्या लक्षात येईल की त्या त्या वेळी आपोआप तयार होईल तुमच्या वेळापत्रकानुसार अभ्यासाची जी वेळ असेल त्या वेळेला अभ्यास करण्याची आणि व्यायामाच्या वेळेला व्यायाम करण्याची तुमची तीव्र इच्छा होईल.

२) चांगली संगत अती मोलाची : मैत्री गोड वागणूक सगळ्यांशीच ठेवा परंतु घनिष्ठता ठेवण्यासाठी मात्र फक्त मोजक्याच मित्रांची निवड करा. याबाबतीत खूप काळजी घ्या. कारण लक्षात ठेवा की चांगल्या संगतीमुळे तुमचे मन तुमच्या नकळत चांगले राहू शकते.

◆◆◆



# संत तुकाराम

- **स्वप्नाली अशोक चौगुले,** बी. कॉम. भाग-२

संत तुकाराम हे वारकरी संत, कवी होते. त्यांचा जन्म देहू या गावात वसंत पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकारामांना वारकरी, जगद्गुरू म्हणून ओळखतात. वारकरी सांप्रदायातील प्रवचन व कीर्तनाच्या शेवटी - 'पुंडलिक वरदेहरि विठ्ठल, श्री ज्ञानदेव, तुकाराम, पंढरीनाथ, महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय' असा जयघोष करतात. जगद्गुरू तुकाराम लोककवी होते.

'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले! तोचि साधू ओळखावा! देव तेथेची जाणावा', अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखविला. वारकरी सांप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. संत तुकारामांनी आपल्या अभंगातून व कीर्तनातून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले. त्यांची माहिती -

मूळ गाव : तुकाराम बोल्हाबा आंबिले (मोरे)
जन्म : १८ जानेवारी १६०८ देहू, महाराष्ट्र
सांप्रदाय : वारकरी सांप्रदाय
गुरू : बाबाजी चैतन्य
शिष्य : संत निळोबा, संत बहिणाबाई
भाषा : मराठी
कार्य : समाजसुधारक, कवी, विचारवंत, लोकशिक्षक
संबंधित तीर्थक्षेत्रे : देहू

तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. 'अभंग म्हटला की तो फक्त तुकारामांचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक



परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यातील अशिक्षित लोकांच्याही नित्यपाठात आहेत.

त्यांचे घराणे मोरे आणि आंबिले आहे. त्यांच्या घराण्यातील विश्वंभर बुवा हे मूळ पुरुष महान विठ्ठल भक्त होते. त्यांच्या घरात पंढरीची वारी करण्याची परंपरा होती. तुकारामांचे वडील बोल्होबा आणि आई कनकाई होती. त्यांना सावजी, हा मोठा भाऊ व कानोबा धाकटा भाऊ, होता. मोठा भाऊ सावजी विरक्त वृत्तीचा होता. घराची संपूर्ण जबाबदारी तुकोबांवरच होती. पुण्याचे आप्पाजी गुळवे यांची कन्या जिजाई (आवली) हिच्याशी त्यांचा प्रथम विवाह झाला होता.

तुकोबांना त्यांच्या प्रापंचिक जीवनात विपत्तींचे तडाखे सहन करावे लागले. अनेक प्रापंचिक दुःखे भोगावी लागली. ते १७-१८ वर्षांचे असताना त्यांचे आई-वडील मरण पावले. मोठा भाऊ विरक्तीमुळे तीर्थाटनाला निघून गेला. भयंकर दुष्काळाचा त्यांना सामना करावा लागला. संतू नावाचा त्यांचा मोठा मुलगा दुष्काळातच गेला. गुरे-ढोरे ही गेली. महाजनकी बुडाली मन उदास झाले. संसारात विरक्ती आली. या परिस्थितीत विठ्ठलावरची आपली परमभक्ती कायम ठेवत देहू गावाजवळील भंडारा डोंगरावर उपासना चालू केली. चिरंतनाचा, शाश्वताचा शोध घेत असताना त्यांना साक्षात्कार झाला. तेथेच परमब्रह्म स्वरूप श्री विठ्ठल त्यांना भेटला असे मानले जाते.

जीवनोत्तर प्रभाव : संत बहिणाबाई शिऊर, ता. वैजापूर ही तुकारामांची शिष्या तुकारामांनी तिला स्वप्नात गुरू उपदेश दिला होता. तुकाराम महाराजांनी वैकुंठ गमन केल्यावर बहिणाबाईची निष्ठा पाहून तिला साक्षात दर्शन दिले होते, असे म्हणतात. तुकारामांची बहिणाबाईला बौद्धांच्या वज्रसूची या बंडखोर ग्रंथाचे मराठी भाषांतर करायला सांगितले होते.

तुकारामांनी लिहिलेली पुस्तके : संत तुकारामांची गाथा म्हणजे बहुजनांची गीता आहे. महाराष्ट्राच्या पावन भूमीत गेली चारशे वर्षे मुक्तीची ज्ञानगंगा या गाथेच्या रूपाने वाहत आहे. ज्ञानोबा, तुकाराम म्हणजे महाराष्ट्राची सांस्कृतिक विद्यापीठे आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे अध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. अभंग आणि ओवी हे तळागळातील समाजात ठाण मांडून बसलेले आहेत. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे 'जीवनाची बाग हरली' ती ज्ञानोबा तुकारामांच्या या अभंगाची भाषा सरळ आणि सोपी आहे.

१) अभंगवाणी प्रसिद्ध तुक्याची
२) आनंद ओवरी (कादंबरी)
३) आनंद डोह
४) तुका आकाशएवढा
५) तुका म्हणे
६) तुका झाले कळस
७) तुका झाला पांडुरंग

चित्रपट : इ.स. १९३६ मध्ये प्रभात फिल्म कंपनीच्या विष्णूपंत दामले व फत्तेलाल शेख यांनी मराठीत 'संत तुकाराम' या नावाने चित्रपट बनविला. या चित्रपटाला अपूर्व यश प्राप्त झाले. १२ डिसेंबर १९३८ रोजी मुंबईच्या सेंट्रल सिनेमा येथे प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात विष्णुपंत पागणीस यांनी संत तुकाराम यांचे काम केले होते.

- १९६३ मध्ये संत तुकाराम नावाचा कानडी चित्रपट आला होता. दिग्दर्शक - सुंदरा नाडकर्णी

- तुका झालासे कळस (मराठी चित्रपट १९६४)

- १९६५ मध्ये तुकारामांवर हिंदी चित्रपट आला त्याचे नाव होते संत तुकाराम

◆◆◆